सकाळ

शनिवार, ६ मार्च २०२१

# विश्वकोश निर्मितीचा हेतू लेखनास प्रवृत्त करणे होय

## डॉ. शामकांत देवरे; शिवाजी कॉलेजात कार्यशाळा

**सातारा, ता. ५ :** विश्वकोश हा माहितीचा महासागर आहे. महाराष्ट्र शासनाने मराठी विश्वकोशाचे लेखन हे ग्रंथरूपात करवून घेतले आहे. मराठी विश्वकोशाच्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करून जिज्ञासू वाचकांना मराठीत विचार करण्यास, लेखनास प्रवृत्त करणे, हाच विश्वकोश निर्मितीमागील हेतू आहे, असे मत वाई येथील मराठी विश्वकोश कार्यालयाचे सहायक सचिव डॉ. शामकांत देवरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मराठी विश्वकोश कार्यालय आणि छत्रपती शिवाजी कॉलेज यांच्या वतीने कॉलेजमध्ये 'विश्वकोश नोंद लेखन' कार्यशाळा नुकतीच झाली. त्यावेळी डॉ. देवरे बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. सुभाष वाघमारे होते. या वेळी विश्वकोश कार्यालयाचे सरोजकुमार मिठारी म्हणाले, 'मानव्यविद्या, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, प्रशासन या सर्व शाखांतील सर्व विषयांचे ज्ञान या ज्ञानकोशातून मिळते.

सर्व विषयांतील ज्ञानाच्या नोंदी मराठी भाषेत केल्या जातात. लेखकाकडून आलेल्या नोंदी लेखन तज्ज्ञांकडून तपासून घेतल्या जातात.' डॉ. सुभाष वाघमारे म्हणाले, ''विश्वकोश निर्मितीसाठी मे. पुं. रेगे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांसारख्या ज्ञानोपासक यांचे योगदान मोलाचे आहे.'' समन्वयक डॉ. कांचन नलावडे यांनी प्रास्ताविक केले. या वेळी उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. अनिल वावरे, डॉ. संजयकुमार सरगडे, डॉ. सुरेश झोडगे, डॉ. संपत पिंपळे, डॉ. मानसी लाटकर उपस्थित होत्या.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा